# आदिम,संस्कृती,अभ्यास,संशोधन व मानव विकास केंद्र

मु.फलोदे,पो.तळेघर,ता.आंबेगाव, जिल्हा-पुणे

( रजि नं- एफ 47,365 )

# वार्षिक अहवाल

## सन -२०१७-१८

# अनुक्रमणिका


- प्रस्तावना
- साक्षरता प्रकल्प
- शिक्षण विषयक उपक्रम
- आरोग्य विषयक उपक्रम
- शाश्वत उर्जा
- पर्यावरण
- लोकसहभागाची कामे
- शासकीय विभागासोबत झालेले कार्यक्रम
- रोजगार
- साध्य बाबी

# प्रस्तावना

आदिम संस्कृती अभ्यास संशोधन व मानव विकास केंद्र हि संस्था आदिवासी,दलित व वंचित घटकांच्या सामाजिक शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कटिबद्ध असणारी संस्था आहे.संशोधन व अभ्यास या आधारे या वंचित घटकांच्या विकासप्रक्रियेत सकारात्मक हस्तक्षेप संस्था करत आहे.या अनुषंगाने विविध उपक्रम,छोटे अभ्यास संस्था संस्था सातत्याने करीत असते.या प्रक्रियेत समाजातील विविध अभ्यासू लोकांना सोबत घेऊन संस्था आपल्या उद्देशाच्या पूर्ततेसाठी कार्य करीत आहे.

सन २०१७ चा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करताना नक्कीच संस्थेला आनंद होत आहे.या वर्षात आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात फलोदे ता.आंबेगाव या गावातील जिल्हा परिषद शाळेत वर्षभर भाषिक प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात आला.पुणे येथील युनिक फौंडेशन यांचे डॉ.रखमाबाई अभ्यास संशोधन केंद्र यांच्यासोबत हा प्रकल्प सुरु होता.या वर्षात या अभ्यास प्रकल्पाबरोबरच, १० ठिकाणी साक्षरता वर्ग याचे संयोजन व पर्यवेक्षण करून हा हा उपक्रम अधिक प्रभावशाली करण्यात नक्कीच यश प्राप्त झालेले आहे. साक्षरता वर्गाच्या माध्यमातून निरक्षर महिला-पुरुष यांच्यामध्ये विविध प्रकारची जाणीवजागृती राबवली जात आहे.या साक्षरता प्रकारचे महत्वपूर्ण यश म्हणजे आदिवासी भागातील महिलांना एक आत्मभान देण्याचे कार्य हा प्रकल्प करत आहे.

याबरोबरच रोजगार निर्मितीसाठी हि काही प्रकल्प आयोजित करण्यात आले होते.आश्रमशाळेच्या शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करून शिक्षणक्षेत्रात सकारात्मक हस्तक्षेप सुरु करण्यात आला आहे.

अभ्यास,संशोधन व प्रत्यक्ष कृतिकार्यक्रम याधारे संस्थेचे आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात मुलभूत स्वरूपाचे काम सुरु आहे.या कामासाठी आम्हाला सहकार्य करणाऱ्या सर्व संस्था,सरकारी विभाग,व्यक्ती संघटना यांचे आम्ही ऋण व्यक्त करतो.व यापुढे ही मुलभूत व शाश्वत स्वरूपाचे काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आमची संस्था नक्कीच करेल,या आशावादासह.धन्यवाद.

**संस्थेचे कार्यकारी मंडळ**

# साक्षरता प्रकल्प

**प्रस्तावना** –

औपचारिक शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षण हि गाव विकासासाठी अत्यंत महत्वाचे आहे.या अनुषंगाने दहा साक्षरता वर्ग आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात सुरु केले आहेत.ऑगस्ट २०१७ मध्ये रोटरी क्लबच्या सहकार्याने हा साक्षरता प्रकल्प सुरु झालेला होता.या प्रकल्पाअंतर्गत आंबेगाव तालुक्यातील १० ठिकाणी साक्षरता वर्ग सुरु करण्यात आले होते. या साक्षरता वर्गात लेखन,वाचन याबरोबरच जीवनउपयोगी साक्षरता हि प्रदान केली जात आहे.या साक्षरता प्रकल्पाच्या अनुषंगाने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

**प्रकल्पाचा उद्देश** –

- आंबेगाव तालुक्यातील आदिवासी वाडी वस्तीवर साक्षरता वर्ग सुरु करून आदिवासी निरक्षर यांना साक्षर करणे.
- साक्षरता वर्गात लेखन,वाचन,अंकगणित याबरोबरच कायदा साक्षरता,आर्थिक साक्षरता,आपत्ती व्यवस्थापन साक्षरता व आरोग्य साक्षरता याविषयक मार्गदर्शन साक्षरता वर्गातील महिला-पुरुषांना देऊन त्यांना कायदेविषयक ज्ञान व माहिती सोप्या भाषेत देणे.
- साक्षरता वर्गातील महिला व पुरुष यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करून भारतीय राज्यघटनेने दिलेले मुलभूत हक्क व कर्तव्ये यांची त्यांना जाणीव करून देणे.
- साक्षरता वर्गाच्या माध्यमातून व्यक्तिगत व सामाजिक विकास प्रक्रियेला चालना देणे.
- गावाच्या ग्रामसभेत लोकांचा सकारात्मक हस्तक्षेप वाढवा यासाठीचे विविध माहिती देऊन साक्षरता वर्गातील महिलांना व पुरुषांना प्रशिक्षित करणे.

## 1. साक्षरता वर्ग उदघाटन कार्यक्रम –

आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागात आजही निरक्षरता मोठ्या प्रमाणात आहे.हि निरक्षरता दूर करण्याबरोबरच आर्थिक,कायदा,व आपत्ती व्यवस्थापन इ.साक्षरता,साक्षरता वर्गातून देण्याचे ठरले आहे.रोटरी क्लब यांच्या सहकार्यातून फलोदे व परिसरातील ७ गावात साक्षरता वर्ग सुरु करण्याचे ठरले आहे .यासाठीची पूर्वतयारीची कामे पार पडली आहेत. दिनांक २९-७-१७ रोजी या साक्षरता वर्गाचे उदघाटन शहीद राजगुरू ग्रंथालय,फलोदे येथे पार पडले.यावेळी उपस्थित रोटरी च्या सदस्यांसमोर फलोदे गावात आजपर्यंत झालेल्या कामाचे सादरीकरण करण्यात आले.

## २.साक्षरता व समाजपरिवर्तन हा विषय मांडणी –

रोटरी क्लब पुणे यांनी पुणे येथे दिनांक १३-८-20१७ रोजी साक्षरतेवर परिसंवाद आयोजित केला होता.या परिसंवादात साक्षरता व समाजपरिवर्तन या विषयावर श्री.अमोल वाघमारे यांनी मांडणी केली.

## ३.साक्षरता वर्गाच्या अनुषंगाने सात गावामध्ये पार पडलेल्या बैठका-

- **विविध घटकासमवेत झालेल्या बैठका –**

आंबेगाव तालुक्याच्या सात आदिवासी गावात साक्षरतेचे वर्ग सुरु होणार आहेत.या सातही गावांमध्ये निरक्षर महिला, पुरुष यांच्या समवेत बैठका पार पडल्या.या बैठकांमध्ये मुख्यत;साक्षरतेचे महत्त्व,साक्षरता व आपले हक्क,याबाबतची माहिती देण्यात आली.आपले दररोजचे आयुष्य जगताना साक्षरता कशी उपयुक्त ठरते हे समजून सांगण्यात आले.या बैठकांमधून निरक्षर महिला, पुरुष यांना शिकण्याची प्रेरणा देण्यात आली.या बैठका म्हाळुंगे,पिंपरी,कुशिरे खू.,कुशिरे बू.,म्हातारदरी,तलेघर, या गावांमध्ये पार पडल्या.या




## ४.साक्षरता वर्ग उदघाटन कार्यक्रम

आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागातील सात गावांमध्ये साक्षरता वर्ग सुरु करण्याचे सर्व नियोजन झालेले आहे .या साक्षरता वर्गाला रोटरी कल्ब व राज्य साधन केंद्र पुणे, सहाय्य करत आहे. या सात आदिवासी गावात सात साक्षरता वर्ग सुरु होत आहे.प्रत्येक साक्षरता वर्गात २० निरक्षर महिला पुरुष शिकणार आहेत.या साक्षरता वर्गात लेखन,वाचन,अंकगणित याबरोबरच कायदा साक्षरता,आर्थिक साक्षरता व आपत्ती व्यवस्थापन इ.विषयक माहिती हि प्रदान केली जाणार आहे. या साक्षरता वर्गाचे औपचारिक उदघाटन  दिनांक ११-९-२०१७ रोजी शहीद राजगुरू ग्रंथालयाच्या आवारात पार पडले.यावेळी आंबेगाव तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री.राहुल काळभोर,याबरोबरच राज्य साधन केंद्राचे प्रतिनिधी,रोटरी कल्ब च्या प्रतिनिधी, व परिसरातील सुमारे २०० स्त्री-पुरुष उपस्थित होते.या कार्यक्रमात शिक्षणाची गरज व भारतीय नागरिकाचे हक्क आणि कर्तव्ये याबाबतची सविस्तर माहिती उपस्थिताना मिळाली.




## ५.स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यक्रम –

आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागात सात गावांमध्ये साक्षरता वर्ग सुरु होत आहेत.या साक्षरता वर्गात शिकविण्याचे काम गावातीलच शिक्षित महिला स्वयंस्फूर्तीने करण्यास तयार झालेल्या आहेत.या स्वयंसेवक महिलांचे एक दिवसीय प्रशिक्षण दिनांक २३-९-२०१७ रोजी शहीद राजगुरू ग्रंथालय,फलोदे येथे पार पडले.श्री.अमोल वाघमारे,श्री.अशोक जोशी यांनी संपूर्ण दिवसभर सुमारे १५ महिलांना साक्षरता व निरंतर शिक्षणाच्या अनुशंगाने प्रशिक्षण दिले गेले.




### ६.स्वयंसेवक प्रशिक्षण –

साक्षरता वर्गात निरक्षरांना अध्यापनाचे कार्य करणाऱ्या स्वयंसेवीकाना दिनांक २-१२-२०१७ रोजी संवाद कौशल्ये या विषयावर श्री.उज्ज्वल तावडे सर यांनी प्रशिक्षण दिले.या प्रशिक्षणाचा स्वयंसेविकांना निश्चितच खूप फायदा झालेला आहे.हे प्रशिक्षण सुमारे १४ स्वयंसेविकांना देण्यात आले आहे.



## ७.साक्षरता वर्ग-

आंबेगाव तालुक्याच्या ७ आदिवासी गावात नियमितपणे साक्षरता वर्ग भरत आहे.यातील प्रत्येकी साक्षरता वर्गात १५ ते २० निरक्षर महिला शिकायला येत आहे.या साक्षरता वर्गात लेखन वाचन अंकगणित हे शिकविण्या बरोबरच कायदा साक्षरता.आर्थिक साक्षरता इ.विषयक मार्गदर्शन हि केले जात आहे .



## ८.आर्थिक साक्षरता-

दिनांक १०-११-२०१७ रोजी म्हतारदरी येथील साक्षरता वर्गात आर्थिक साक्षरता उदबोधन कार्यक्रम पार पडला.तलेघर गावाचे पोस्टमन श्री.जाधव सर यांनी या कार्यक्रमात उपस्थित महिलांना पोस्टाच्या विविध योजना समजावून सांगितल्या



## ९.दीपगृह संस्था,पुणे यांच्या प्रतिनिधी समवेत बैठक –

दीपगृह संस्था,ताडीवाला रोड,पुणे येथे दीपगृह संस्था, यांच्या प्रतिनिधी श्रीमती भोसले यांच्यासमवेत श्री.अमोल वाघमारे यांची बैठक पार पडली.या बैठकीत मुख्यत:साक्षरता वर्गाचे आयोजन दीपगृह संस्था पुणे शहरात कशा प्रकारे करत आहे. याची सविस्तर माहिती घेण्यात आली.साक्षरता वर्गाची प्रशासकीय बाजू समजून घेण्यात आली.या बैठकीत मिळालेल्या माहितीचा आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागात साक्षरता वर्ग सुरु करण्यास नक्कीच फायदा होईल.

## १०.साक्षरता वर्गातील महिलांसाठी डोळे तपासणी शिबीर -

साक्षरता वर्गातील महिलांसाठी दिनांक २-१२-२०१७ रोजी डोळे तपासणी शिबीर शहीद राजगुरू ग्रंथालय,फलोदे येथे आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात सुमारे ७६ नवसाक्षर महिला पुरुषांची डोळे तपासणी करण्यात आली.यासाठी डॉ.बबन डोळस व डॉ.कसबे यांनी कोणतेही शुल्क न आकरता मोफत नेत्र चिकित्सा केली.यातील सुमारे ७० इतक्या नवसाक्षर महिला पुरुषांना चष्म्याची आवश्यकता होती.हे चष्मे रोटरी कल्ब ऑफ,कोथरूड यांनी उपलब्ध करून दिले.नुकतेच हे चष्मे वाटप करण्यात आले आहेत.



# शिक्षण विषयक कामे-

## भूमिका –

साक्षरता वर्गाच्या माध्यमातून अनौपचारिक शिक्षण क्षेत्रात आपण सकारात्मक हस्तक्षेप करत असतानाच औपचारिक शिक्षण क्षेत्रात हि आपण सकारात्मक हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करीत आहोत.या नुसार मुख्यत फलोदे गावातील प्राथमिक शाळेतील शालेय व्यवस्थापन समिती अधिक सक्रीय कशी होईल यासाठी प्रयत्न केले गेले व विशेष प्रकारचा भाषिक अभ्यास प्रकल्प हि राबविला गेला.याबरोबरच शिक्षकांना प्रशिक्षण देऊन कृतीशील शिक्षण पद्धतीला चालना देण्याचा प्रयत्न केला गेला.

## १.शालेय व्यवस्थापन समिती बैठक –

दिनांक १६-६-२०१७ रोजी फलोदे गावातील शालेय व्यवस्थापन समितीची बैठक प्राथमिक शाळेत पार पडली.या बैठकीला पालक,शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य,शाळेतील शिक्षक व अमोल वाघमारे असे एकूण १६ व्यक्ती उपस्थित होते .या बैठकीत इयत्ता पहिलीतील  नवोदित मुला- मुलींचा सत्कार करण्यात आला.शाळेच्या परिसरात वृक्ष लावण्यासाठी खड्डे खोदणे व झाडांना कंपाऊड करणे याबाबतचे नियोजन करण्यात आले. याबरोबरच मागील बैठकीत झालेल्या निर्णयांचा आढावा घेण्यात आला.



## २.शिक्षकांसाठी रचनावादी पद्धतीने प्रशिक्षणे आयोजित करणे.

या संदर्भात आदिवासी विकास विभागाशी समन्वय करून दिनांक ८-१२-२०१७ रोजी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, गोहे आश्रमशाळा येथे आयोजित करण्यात आली होती.या प्रशिक्षणात इयत्ता ३ री व इयता ४ थी च्या शिक्षकांना विज्ञान व गणित या विषयाच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्यात आले होते.हे प्रशिक्षण श्रीमती.विनया मालती हरी यांनी दिले.कृतियुक्त प्रशिक्षण देऊन त्यांनी शिक्षकांना अंतर्मुख केले.



# आरोग्य विषयक कामे

## भूमिका-

साक्षरता वर्गाच्या माध्यमातून आरोग्य विषयक विविध उपक्रम आपण आयोजित केले होते.याबरोबरच अत्यंत दुर्गम अशा पदरवाडी येथे जन आरोग्य मंच या संघटनेच्या सहकार्याने दि.   रोजी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करणे असेल किवा रक्तपांढरी या सारख्या आजारावर जाणीवजागृती कार्यक्रम जाणीवपूर्वक आयोजित केले गेले.

## 1. पदरवाडी येथे आरोग्य शिबीर –

पदरवाडी हि पुणे जिल्ह्याच्या अत्यंत दुर्गम ठीकानी वसलेली आहे.या दोन डोंगरांच्या मध्यभागी आहे.येथे पोहचण्यासाठी एक संपूर्ण डोंगर उतरून जावे लागते.अशा दुर्गम ठिकाणी जन आरोग्य मंच या संघटनेच्या सहकार्याने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात रुग्णांची तपसणी डॉ.ज्ञानेश्वर मोटे यांनी केली यावेळी सुमारे ४० रुग्णांची तपासणी करण्यात आली.



## 2. रक्तपांढरी जाणीव-जागृती कार्यक्रम –

दिनांक २३-६-२०१७ रोजी साथी सेहत व रचना ट्रस्ट यांच्या वतीने फलोदे गावात ग्रामपंचायत कार्यालयात रक्तपांढरी आजाराविषयी जाणीव जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी श्री.कोंडे श्री ,शैलेश डीखळे यांनी स्लाईड शो व  फिल्म यांच्या माध्यमातून रक्तपांढरी या आजाराची अत्यंत महत्वपूर्ण व उदबोधक माहिती उपस्थित महिला , पुरुष व युवक –युवती यांना सांगितली.या कार्यक्रमांनतर महिला व पुरुषांनी एकत्रित या आजाराच्या निर्मुलनासाठी खालील निर्णय घेतले.यामध्ये घरातील भांडी जास्तीत जास्त लोखंडी वापरायची असे ठरले . स्वच्छता घरात ठेवण्याचे ठरले . पालेभाज्या सांडपाण्यावर पिकविण्याचे ठरले.पुढील महिन्यात रानभाजी महोस्तव व पाककला कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले.



३ .दिनांक २६-५-१७ रोजी घोडेगाव ता .आंबेगाव   पुणे येथे रोटरी कल्ब व तहसील कार्यालय आंबेगाव यांच्या वतीने महिलांची स्तन व गर्भाशय पिशवी तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात फलोदे गावातील सुमारे १७ महिलांची तपासणी करण्यात आली. यातील २ महिलांना पुढील तपासण्या व औषधोपचार करण्यासाठी मंचर येथील उपजिल्हा रुग्णालय येथे पाठविण्यात आले.

# शाश्वत उर्जा-

## १.पदरवाडी येथे सौर दिव्यांचे वाटप –

पुणे जिल्ह्यातील पदरवाडी हि अत्यंत दुर्गम अशा ठिकाणी आहे.संपूर्ण जंगलाने वेढलेली हि वस्ती आहे.व दोन डोंगराच्या मध्यभागी वसलेली हि वस्ती आहे.या वस्तीत वीज पोहचली नाही व पोहचू हि शकत नाही अशी येथील भौगोलिक परिस्थिती आहे.अशा ठिकाणी सौरउर्जा हाच पर्याय होता.याठिकाणी एप्रिल २०१७ या दरम्यान संस्थेचे अमोल वाघमारे,सोमा केंगले यांनी या दुर्गम ठिकाणी भेट देऊन पाहणी केली व यानंतर ए.पी.टी.रिसर्च संस्था यांच्याशी संपर्क साधला.या संस्थेच्या प्रमुख डॉ.किशोरी आपटे यांनी या ठिकाणी सौरदिवे लावण्याचे मान्य केले त्यानंतर दि.१ मी २०१७ रोजी या ठिकाणी सौरदिवे लावून सुमारे १७ कुटुंबे अंधारातून प्रकाशाकडे नेण्यात यश आले.याप्रसंगी ए.पी.टी.रिसर्च संस्था यांच्या प्रमुख डॉ.किशोरी आपटे,डॉ.ज्ञानेश्वर मोटे,अमोल वाघमारे,सोमा केंगले व नागरिक उपस्थित होते.




## २,सौर दिवे वाटप-कुशिरे बु –

पुणे जिल्ह्यातील,आंबेगाव तालुक्यातील कुशिरे येथील बिबळे वस्ती हि अत्यंत दुर्गम अशा ठिकाणी आहे.या वस्तीत वीज पोहचली नाही व पोहचू हि शकत नाही अशी येथील भौगोलिक परिस्थिती आहे.अशा ठिकाणी सौरउर्जा हाच पर्याय होता. ए.पी.टी.रिसर्च संस्था यांच्या सहकार्यातून दि.१ ० मे,२०१७ रोजी या ठिकाणी सौरदिवे लावून सुमारे १० कुटुंबे अंधारातून प्रकाशाकडे नेण्यात यश आले.याप्रसंगी ए.पी.टी.रिसर्च संस्था यांच्या प्रमुख डॉ.किशोरी आपटे,डॉ.ज्ञानेश्वर मोटे,अशोक पेकारी,अमोल वाघमारे, व नागरिक उपस्थित होते.





# पशुसंवर्धन –

## १.शेळीपालन विषयक मार्गदर्शन व जनावरे तपासणी शिबीर

पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती,आंबेगाव व ग्रामपंचायत फलोदे यांच्या सयुंक्त विद्यमाने फलोदे येथे दिनांक ७-९-२०१७ रोजी फलोदे ग्रामपंचायत येथे शेळीपालन विषयक मार्गदर्शन शिबीर व जनावरे तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.यावेळी उपस्थित शेतकर्यांना पशुसंवर्धन विभागाचे प्रमुख डॉ.चिखले सर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.यामध्ये शेळीचे निवासस्थान,शेळ्यांचा आहार,शेळ्यांचे आरोग्य,शासकीय योजना व शेळीचा विमा योजना इ.मुद्दे त्यांनी सविस्तर मांडले.यानंतर उपस्थित शेतकरी आणि शेळीपालक यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे डॉ.चिखले यांनी सविस्तर व समर्पक उत्तरे दिली. यानंतर सुमारे ७० शेळ्या व सुमारे६० गाय,म्हशी व बैल यांची तपासणी व त्यांना औषधउपचार केले गेले.





## २.शेळीपालन व्यवसाय प्रशिक्षण-

दिनांक ९ व १० डिसेंबर २०१७ रोजी शेळीपालन व्यवसाय विषयक प्रशिक्षण कार्यक्रम, शहीद राजगुरू ग्रंथालय फलोदे येथे आयोजित करण्यात आला होता.या प्रशिक्षणात फलोदे व परिसरातील सुमारे ३० युवकांना प्रशिक्षण देण्यात आले.



# पर्यावरण –

## १.प्रायोगिक भातशेती –

आदरणीय श्री.नरेंद्र खोत सर,श्री श्रीनिवास खेर सर व विनायक कदम सर यांच्या मार्गदर्शनातून सावरली गावात प्रयोगिक भातशेतीचा प्रकल्प सुरु आहे.यामध्ये प्रत्येकी २-२ गुंठ्याम्ध्ये मल्चिंग पेपरवर,पारंपरिक व चारसूत्री अशा तीन पद्धतीने भात शेती केली गेली आहे.दिनांक २६-७-१७ रोजी पारंपरिक व चारसूत्री भातशेतीत रोपांची लावणी करण्यात आली.





## २.बाळहिरडा या औषधी झाडाची छोटी नर्सरी –

बाळहिरडा हे  या भागतील अत्यंत महत्त्वाचे झाड आहे.या झाडाला येणाऱ्या फळांना हिरडा असे म्हणतात.हे हिरडा फळ अनेक औषधनिर्मिती मध्ये वापरले जाते.त्यामुळे या फळांना मोठ्या प्रमाणात मागणी असते.येथील आदिवासी ह्या फळांची विक्री करून आपले जगणे सुकर करण्याचा प्रयत्न करत असतात.या झाडांच्या रोपांची नर्सरी करणे गरजेचे होते हे लक्षात घेऊन उन्हाळयामध्ये या झाडाच्या बिया गोळा करण्यात आल्या होत्या त्या बियांवर प्रक्रिया करून त्याची रोपवाटिका केली गेली.सुमारे ८० बियांपैकी  १५ झाडे उगवून आली आहेत.



## ३.प्लास्टिकच्या कचऱ्याचे विघटन व पूनर्वापर याबाबत झालेली बैठक –

पुण्यातील एका युवकांचा गट प्लास्टिकच्या कचऱ्याचे विघटन व पूनर्वापर याबाबतीत खूप छान काम करत आहे.या गटातील काही युवक – युवती यांच्या समवेत दिनांक १६-९-२०१७ रोजी बैठक पार पडली.या बैठकीत फलोदे व सावरली गावातील प्लास्टिक कचरा कसा कमी करता येईल याबाबत चर्चा झाली.व सावरली गावाला पक्का रस्ता नसल्याने प्लास्टिक पासून रस्ता करता येईल का याबाबत हि चर्चा झाली. या युवक गटाने ठरल्याप्रमाणे दिनांक २४-९-२०१७ रोजी फलोदे,सावरली गावाला भेट दिली आहे.व या गावात कचऱ्याचा प्रश्न कसा सोडविता येईल याबाबत स्थानिक ग्रामस्थांसमवेत चर्चा केली आहे.

## ४.सेंद्रिय शेती उदबोधन कार्यक्रम –

दिनांक ६-९-२०१७ रोजी कृषी कार्यालय, आंबेगाव तालुका यांच्या सहयोगाने फलोदे गावातील निवडक शेतकरी यांचे सेंद्रिय शेती विषयक उदबोधन कार्यक्रम पार पडला.यावेळी कृषी कार्यालयातील श्री.गणेश पडवळ व श्री.इंदोरे सर यांनी उपस्थित शेतकऱ्याना मार्गदर्शन केले.यामध्ये शेतीविषयक गावामध्ये जी समिती स्थापन केली होती त्या समितीचे सर्व सदस्य या वेळी उपस्थित होते.यावेळी सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकरयांचा गट स्थापन करण्याचे नियोजन झाले.सेंद्रिय शेतीची गरज,सेंद्रिय शेतीसाठी करावी लागणारी खते व औषधे इ.सेंद्रिय शेतीतील संधी इ.बाबीची माहिती सविस्तर देण्यात आली.



# लोकसहभागाची कामे

१.राजपूर गावात ग्रंथालय सुरु करणेबाबत लोकांचा कल समजून घेण्यासाठी व त्यांच्या सूचना कळाव्यात यासाठी एक प्रश्नावली भरून घेण्याचे निश्चित झाले .त्यानुसार गावातीलच युवकांनी हि प्रश्नावली भरून घेतली.गावातील जास्तीत जास्त लोकांच्या सूचना घेतल्या आहेत.हे सर्व काम युवकांनी स्वत;पुढाकार घेऊन केले.

२.फलोदे गावातील सार्वजनिक विहीर च्या शेजारी एक चर आहे.या चरातून प्रचंड माती वाहून जात होती.यामुळे या चराला दगडी बांध घालणे  गरजेचे आहे . यासाठी दिनांक ३१-५-२०१७ रोजी हे चर बांधण्यासाठी गावातील युवकांनी  दगड जमा करून ट्रकटर मध्ये भरून  संबधित जागेवर आणून दिला . यामुळे हे काम करण्यास खूपच फायदा झाला.



३.फलोदे गावातील महिलांनी दिनांक ४-६-२०१७ रोजी सार्वजनिक विहिरीच्या शेजारी असलेल्या चराला ६ दगडी बांध; श्रमदान मोहीम राबवून बांधले.यामुळे माती वाहून जाण्यास पायबंद बसू शकेल.व पळणारे पाणी स्थिर होण्यास मदत होईल .



४.फलोदे गावातील  ६ युवक व श्री अमोल वाघमारे हे एकत्रित येऊन यांनी दिनांक १-८-२०१७ रोजी ग्रामपंचायत परिसरात झाडे लावण्यात आली.व त्यांना कंपाउंड करण्यात आले.



## ५.वृक्ष लागवड व संगोपन

फलोदे गावातील युवक व शिवशंकर विद्यालय तलेघर येथील कनिष्ठ महाविद्यालयातील सुमारे ५५ युवक युवती यांनी दिनांक ९-९ -२०१७ रोजी फलोदे गावाच्या रस्त्याच्या बाजूला झाडे लावण्यात आली.या झाडांना कंपाउंड करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्याशी फलोदे गावात सुरु असलेल्या विकासप्रकल्पाविषयी श्री.अमोल वाघमारे यांनी संवाद साधला. यावेळी ग्रंथालयाच्या कामकाजाची माहिती अशोक जोशी यांनी उपस्थिताना दिली.



# शासकीय विभागासमवेत झालेले कार्यक्रम

## १.खाते फोड शिबीर –

दिनांक २८-७-२०१७ रोजी फलोदे गावात तहसील कार्यालय यांच्या सहयोगाने ग्रामपंचायत कार्यालय,फलोदे येथे खातेफोड शिबीर आयोजित करण्यात आले होते.वर्षानुवर्षे जमिनीची खातेफोड न झाल्यामुळे आदिवासी शेतकरी यांची नावे ‘८ अ’ ला नसतात.त्यामुळे शेतकरी म्हणून त्यांची नोंद नसते.यामुळे विविध शासकीय योजनेचा त्यांना फायदा घेता येत नाही.यामुळे हे विशेष शिबीर आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाला मा.तहसीलदार,मा.नायब तहसीलदार स्वत:उपस्थित होते.यावेळी सुमारे २० आदिवासी शेतकरी यांचे खातेफोडीचे अर्ज भरून घेऊन त्यांच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली.यावेळी फलोदे व परिसरातील सुमारे १०० ग्रामस्थ उपस्थित होते.



# रोजगार

बांबू हस्तव्यवसाय प्रकल्पात काम करू इच्छिणारे तरूण व तरुणी यांची एकत्रित बैठक दिनांक १-११-२०१७ रोजी शहीद राजगुरू ग्रंथालय येथे पार पडली.या बैठकीला विज्ञान आश्रम पाबळ चे श्री.रणजीत सर व दीपक सर उपस्थित होते.या बैठकीत विविध बांबू हस्तव्यवसाय प्रकल्पांची माहिती उपस्थितांना देण्यात आली.बांबू पासून विविध वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण डिसेंबर महिन्यात आयोजित करण्याचे ठरले आहे.



## साध्य बाबी-

- रोटरी क्लब यांच्या सहकार्यातून १० गावात साक्षरता वर्ग सुरु झालेले आहेत.या साक्षरता वर्गाच्या माध्यमातून सुमारे २०० महिला साक्षर होत आहे.
- एकुन३० कुटुंबाना आपण सौर दिव्यांच्या माध्यमातून वीज पोहचवू शकलो.
- फलोदे गावात प्राथमिक शाळेची गुणवत्ता कशी विकसित होईल यासाठी प्रयत्न केले गेले.
- शिक्षकांचे विशेष प्रशिक्षण घेऊन शिक्षणातील गुणवत्ता कशी विकसित होईल यादृष्टीने प्रयत्न केले गेले.
- आंबेगाव तालुक्यातील शासकीय विभाग याचे सोबत चांगला समन्वय प्रस्थापित होत आहे.
- शेळी विषयक प्रशिक्षण आयोजित करून शेळीपालन करणाऱ्या शेतकरी बांधवाना या व्यवसाय विषयक आधुनिक प्रशिक्षण देण्यात आले.